सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५

आतील पानावर

पान २– हुमा बनली ओटीटी विश्वातील नवी 'राणी'
पान ३– मृत्यूचाही सुलक्षण योग
पान ४– हिमॅन अन् ड्रिमगर्लकडून बरंच काही...
पान ५– सुवर्ण युगाचा अस्त
पान ६– माधुरीसोबत झळकणार 'हा' अभिनेता



# अलविदा 'हि मॅन'

## हम तुम जुदा ना होंगे

गेली सहा दशके चित्रपटसृष्टीवर आपल्या रांगड्या अभिनयाची छाप पाडणारे, रोमँटिक ते ॲक्शन हिरो असा प्रदीर्घ प्रवास करणारे धर्मेंद्र यांचे नुकतेच निधन झाले. १९६० मध्ये चित्रपटसृष्टीत पहिले पाऊल टाकल्यानंतर धर्मेंद्र यांची कारकीर्द बहरत गेली आणि स्वतःच्या अभिनयाची, संवादफेकीची, ॲक्शनपटांची एक छाप धर्मेंद्र यांनी सोडली. तिनशेपेक्षा जास्त चित्रपटांमध्ये अभिनयाचा ठसा उमटवणारे ही-मॅन, जे प्रेक्षकांना नेहमी सांगत, अगर तुम भूला ना दोगे, सपने ये सच ही होंगे, हम तुम जुदा ना होंगे, पण आपल्या ९० व्या वाढदिवसाच्या आधीच, आठवणींचा मोठा खजिना मागे ठेवून महान अभिनेते धर्मेंद्र आपल्यातून निघून गेले.

८९ व्या वयातही त्यांच्या चेहऱ्याची ती चमक तशीच होती. दोन पत्नी, सहा मुलं आणि १३ नातवंडं असा त्यांचा भलामोठा परिवार होता. अवघ्या १९ व्या वर्षी त्यांनी प्रकाश कौर यांच्याशी लग्न केलं होतं. तेव्हा त्यांनी सिनेमात पाऊलसुद्धा ठेवले नव्हते. या लग्नातून त्यांना चार मुले झाली. सनी देओल, बॉबी देओल आणि दोन मुली विजेता व अजीता. धर्मेंद्र लोकप्रिय झाले तसे त्यांची कीर्तीही वाढली. सत्तरच्या दशकापर्यंत ते हिंदी सिनेमा क्षेत्रातील सर्वोत्तम अभिनेत्यांपैकी एक मानले जाऊ लागले. आणि मग आला शोले हा चित्रपट. या चित्रपटात त्यांच्या सोबत हेमा मालिनी पडद्यावर दिसल्या आणि नंतर दोघांनी लग्न केल्याची बातमी आली. अनेक अफवा पसरल्या की प्रकाश कौर यांनी घटस्फोट न दिल्याने धर्मेंद्र यांनी इस्लाम धर्म स्वीकारला. मात्र, धर्मेंद्र यांनी या सगळ्या अफवा नाकारल्या होत्या. धर्मेंद्र यांची जोडी जवळजवळ प्रत्येक अभिनेत्रीबरोबर लोकप्रिय होती, परंतु हेमा यांच्यासोबतची त्यांची जोडी विशेष आवडती होती. दोघांनी २८ चित्रपटांत एकत्र काम केले. धर्मेंद्र यांनी बेताब, घायल आणि घातक या तीन सुपरहिट चित्रपटांचे निर्मिती केली. त्याच काळात हेमाच्या दिग्दर्शनातील तीन चित्रपट मात्र प्रेक्षकांनी नाकारले. धर्मेंद्र यांनी फिल्मफेअर टॅलेंट कॉन्टेस्ट (१९५८) पासून संघर्षाची सुरुवात केली आणि १९६०मध्ये दिल भी तेरा हम भी तेरेफ मधून पदार्पण केले. त्यांचा पहिला सोलो हिरो चित्रपट फूल और पत्थर (१९६६) होता, ज्यासाठी त्यांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. ७० च्या दशकात ते जगातील सर्वात देखण्या पुरुषांपैकी एक म्हणून निवडले गेले आणि त्यांना वर्ल्ड आयर्न मॅन ही पदवी मिळाली. १९७५ मध्ये आलेला शोले तर प्रसिद्धच, पण त्याच वर्षी प्रतिज्ञामधील मैं जट यमला पगला दीवाना या गाण्याने त्यांना गरम धरम ही उपाधी मिळाली. राजेश खन्नाला टक्कर देणारा एकमेव स्टार म्हणूनही धर्मेंद्र ओळखले जायचे. जीवन मृत्यु, प्रतिज्ञा, लोफर, धर्मवीर, यादों की बारात यांसारख्या अनेक सुपरहिट फिल्म्स त्यांनी दिल्या. साल २०२५ मध्ये येणाऱ्या त्यांच्या इक्कीस या चित्रपटातून ते पुन्हा पडद्यावर येणार होते. परंतु त्याआधीच, ही-मॅन आपल्या चाहत्यांना कायमची आठवण देऊन निघून गेले.

# ऐश्वर्य ठाकरे बिग बजेट चित्रपटात बनणार 'खलनायक'



दसऱ्याच्या ठाकरे कुटुंबाचे नाव गेल्या अनेक दशकांपासून भारतीय राजकारणात एक प्रभावी ओळख आहे. बाळसाहेब ठाकरेंपासून सुरू झालेला हा राजकीय वारसा आज तिसऱ्या पिढीपर्यंत पोहोचला आहे. या कुटुंबातील प्रत्येक सदस्याने राजकारणात एक विशेष भूमिका बजावताना पाहिला मिळत आहे. पण, राजकारणापासून दूर जाऊन बाळासाहेबांचा नातू ऐश्वर्या ठाकरेनं बॉलिवूडमध्ये डेब्यू केलाय. प्रसिद्ध दिग्दर्शक अनुराग कश्यपनं ऐश्वर्यला निशांची या चित्रपटातून लाँच केलं. आपल्या डेब्यू चित्रपटात ऐश्वर्या डबल रोलमध्ये पाहायला मिळाला. 'निशांची'मध्ये त्यांच्या प्रभावी अभिनयाचं सर्वत्र कौतुक झालं. आता 'निशांची'नंतर ऐश्वर्यच्या हाती मोठा चित्रपट लागला आहे. 'निशांची'नंतर आता ऐश्वर्य थेट यश राज फिल्म्सचा एक बिग बजेट ॲक्शन-रोमान्स चित्रपटात झळकणार आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, या चित्रपटात त्याला नकारात्मक भूमिकेसाठी कास्ट करण्यात आले आहे. ज्यामुळे त्याच्या अभिनयाची एक वेगळी बाजू प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. ऐश्वर्यचा सामना 'सैयारा' फेम स्टार अहान पांडे यांच्याशी होणार आहे. ऐश्वर्यचा आणि अहान पांडे यांच्याशिवाय या चित्रपटात एका मराठमोळ्या अभिनेत्रीचीही एन्ट्री झाली आहे. ती म्हणजे शर्वरी वाघ. यश राज फिल्म्सच्या या या क्शन-रोमान्स चित्रपटात अहान पांडे, ऐश्वर्य ठाकरे आणि शर्वरी वाघ हे तीन उत्कृष्ट तरुण कलाकार एकत्र काम करताना दिसणार आहेत. तर मेगा ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे दिग्दर्शक अली अब्बास जफर हे या चित्रपटाचं दिग्दर्शन करणार आहेत. अली अब्बास जफर हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक रोलरकोस्टर राइड ठरवण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाहीत.

# कलाकारांच्या आयुष्याचा सोशल मीडिया अविभाज्य भाग



आम्हा कलाकारांच्या आयुष्याचा सोशल मीडिया हा अविभाज्य भाग झाला आहे. आम्हाला ते आवडो न आवडो, पण आम्हाला त्या माध्यमावर हजेरी लावावी लागते. नुसती हजेरी नाही तर 'आम्ही कसे कालसुसंगत आहोत' हेदेखील पटवून द्यावं लागतं. काही वर्षांपूर्वी आधी कलाकार आणि नंतर त्यांच्या 'पब्लिसिटी'चा मुद्दा यायचा. आता कलाकार राहिले मागे आणि 'पब्लिसिटी' हा मुद्दा पुढे रेटला जातो, असे परखड मत बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री शेफाली शाह हिने व्यक्त केले आहे. पुढे अभिनेत्री म्हणाली, आधी कलाकारांना पब्लिसिटीमध्ये समाविष्ट करून घेतलं जायचं, आता पब्लिसिटीमध्ये कलाकारांचा समावेश केला जातो, हे खटकणारं असलं तरी वास्तव आहे, असे रोखठोक भाष्य अभिनेत्रीने सध्याच्या परिस्थितीवर केले आहेत. तिने सोशल मीडियावर संदर्भात व्यक्त केलेले मत याची चर्चा होत आहे. शेफाली दिल्ली क्राइम या लोकप्रिय वेबसिरीच्या तिसऱ्या सीझनमुळे चर्चेत आहे. शेफालीची मुख्य भूमिका असलेली दिल्ली क्राइम हि बेबसिरीज नुकतीच नेटफ्लिक्सवर स्ट्रिम करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून या सिरीजची भरपूर चर्चा होती. अखेर सिरीजचा तिसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या सिरीजमधून पुन्हा एकदा शेफाली पोलीस अधिकारी वर्तिका चतुर्वेदी यांच्या भूमिकेत दिसत आहेत. तिच्यासोबत इतरही सहयोगी कलाकार आहेत. या सिरीजमधील शेफालीच्या भूमिकेचे विशेष कौतुक केले जात आहे. या सिरीजविषयी बोलताना शेफाली म्हणाली, जुन्या कलाकृतीचा नवा भाग असो, वा पूर्णपणे नवी कलाकृती असो, कामाला सुरुवात करताना मी टेन्शनमध्येच असते, असे ती म्हणाली. दिल्ली क्राइमचा नवा सीझन हाती घेताना मनात मिश्र भावना असतात. उत्सुकता शिगेला पोहचते असे देखील तिने सांगितले.

# हुमा बनली ओटीटी विश्वातील नवी 'राणी'



बॉलीवूडमध्ये मोठ्या बजेटच्या चित्रपटांभोवतीच बहुधा चर्चा फिरत असते. मात्र, या गदारोळात ओटीटी प्लॅटफॉर्मवर एका अभिनेत्रीने आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. लोकप्रियता दीपिका पादुकोण आणि प्रियंका चोप्रा यांच्या चित्रपटांभोवती केंद्रित असताना हुमा कुरैशीने मात्र ओटीटीवर सलग दोन मोठ्या मालिकांमधून आणि एका चित्रपटातून प्रभावी उपस्थिती नोंदवली आहे. २८ जुलै १९८६ रोजी दिल्लीमध्ये सलीम आणि अमीना कुरैशी यांच्या घरी जन्मलेल्या हुमा कुरैशीने दिल्ली विद्यापीठातील गार्गी महाविद्यालयातून शिक्षण घेतले. महाविद्यालयीन काळात ती 'ॲक्ट १' या रंगमंच समूहाशी जोडली गेली आणि याच मार्गाने तिला मनोरंजन क्षेत्राचा प्रवास सुरू करण्याची संधी मिळाली. जाहिरातींमध्ये काम करत असताना दिग्दर्शक अनुराग कश्यप यांच्या नजरेत ती भरली आणि पुढे तिच्या कारकिर्दीने वेग पकडला. प्रारंभी तिला मिळालेला तमिळ चित्रपट 'बिल्ला खख' प्रकल्प लांबणीवर गेल्याने तिने सोडला. परंतु हा निर्णय तिच्यासाठी लाभदायक ठरला, कारण याच काळात तिला अनुराग कश्यप दिग्दर्शित 'गँग्स ऑफ वासेपूर' या चित्रपटातील मोहसिना ही भूमिका मिळाली आणि तिच्या कारकिर्दीला नवे वळण मिळाले. या वर्षी हुमा कुरैशीने ओटीटी विश्वात जबरदस्त कामगिरी करत आपले वर्चस्व सिद्ध केले. या चित्रपटात तिने अक्षय कुमार यांच्या पत्नी 'पुष्पा पांडे मिश्रा'ची भूमिका साकारली. हलक्या-फुलक्या स्वभावाच्या दृश्यांपासून गंभीर न्यायालयीन प्रसंगांपर्यंत तिचा अभिनय विशेष उठून दिसला. महारानी चौथा पर्व 'राणी भारती'ची भूमिका करणारी हुमा कुरैशी या मालिकेचे प्रमुख आकर्षण ठरली आहे. २०२१ मध्ये पहिला सीझन प्रदर्शित झाल्यापासून या मालिकेला मिळणारा प्रतिसाद प्रत्येक वर्षी वाढतच गेला आहे. चौथ्या पर्वात तिचा राजकीय संघर्ष अधिक प्रभावीपणे उभा राहतो. दिल्ली क्राईम ३ या लोकप्रिय वेब मालिकेच्या तिसऱ्या पर्वातही हुमा कुरैशीने आपल्या अभिनयाची छाप प्रेक्षकांवर सोडली आहे. हुमा कुरैशीने एक थी डायन, डेढ इश्किया, बदलापूर, हायवे, गंगूबाई काठियावाडी, जॉली एलएलबी ३ अशा अनेक महत्त्वाच्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. पुढील वर्षी ती 'टॉक्सिक' या यश अभिनीत मोठ्या प्रकल्पात झळकणार आहे. हुमा कुरैशीने मात्र शांतपणे, कौशल्यपूर्ण आणि प्रभावी अभिनयाच्या जोरावर ओटीटी विश्वात स्वतःचे स्वतंत्र आणि भक्कम स्थान निर्माण केले आहे.

# मृत्यूचाही सुलक्षण योग

तिने चित्रपटसृष्टीचे स्टारडम बघितले. अभिनय व गायन क्षेत्रातही यश मिळाले, पण जीवनात ती खूप एकाकी पडली होती. हिंदी चित्रसृष्टीतील काही लोकांनी तिच्यावर व तिच्या संपूर्ण परिवारावर फार मोठा अन्याय केला. तो सहन करीत तिने गेल्या ६ नोव्हेंबर २०२५ रोजी या जगाचा निरोप घेतला. ती अष्टपैलू अभिनेत्री-गायिका म्हणजे सुलक्षणा पंडित.



१९५४ मध्ये तेव्हाच्या मध्य प्रदेशातील रायगड (सध्याचे छत्तीसगड) येथे ब्राह्मण परिवारात सुलक्षणा पंडित यांचा जन्म झाला. पंडित मणिराम, पंडित प्रतापनारायण आणि पंडित जसराज या तिघा भावंडांचा मेवात घराण्यातील शास्त्रीय संगीतात क्षेत्रात प्रचंड दबदबा होता. सुलक्षणा पंडित यांच्या काकांना म्हणजे पंडित जसराज यांना पद्मश्रीने सन्मानित केले गेले.

पंडित प्रतापनारायण यांना मंधीर, सुलक्षणा, माया, संध्या, विजयता, जतिन आणि ललित अशी सात अपत्ये. त्यात सुलक्षणा दुसरी. सुलक्षणाला वयाच्या नवव्या वर्षापासून शास्त्रीय संगीताची जाण यायला लागली. अशातच घराला दृष्ट लागली व इथूनच या सातही भावंडांचे हाल सुरू झाले. सुलक्षणाच्या वडिलांनी दुसरे लग्न केले व श्रीमंत घराणे असूनही या कुटुंबातील सदस्यांना आपल्या आईसोबत गरिबीत जीवन व्यतीत करावे लागले. वडिलांच्या मृत्यूनंतर नातेवाईकांनीही हळूहळू साथ सोडली. फार कमी वयात सुलक्षणा व मंधीर यांच्यावर संपूर्ण जबाबदारी आली. काही काळ सुलक्षणा व मंधीरने ऑर्केस्ट्राचे शोज केले. त्यात सुलक्षणा पंडित लता मंगेशकरांची गाणी म्हणायची. त्यामधून मिळालेल्या पैशातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालायचा. सुलक्षणा १३ वर्षांची असताना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी १९६७ मध्ये आलेल्या 'तकदीर' चित्रपटात सुलक्षणाला लता मंगेशकर यांच्या सोबत गायनाची संधी दिली.

त्यामधील 'पप्पा जल्दी आ जाना सात समुंदर पार से...' व त्यानंतर १९७१ मध्ये 'दूर का राही' मधील किशोर कुमार यांच्या सोबतचे 'बेकरारे दिल तू गाये जा' ही गाणे लोकप्रिय झाली. दरम्यान, १९६९ मध्ये आलेल्या 'राहगीर'च्या रेकॉर्डिंगच्या वेळी दिग्गज गायक आणि संगीतकार हेमंत दा यांनी सुलक्षणाला असा आशीर्वाद दिला की, तू खूप सुंदर आहेस. अभिनेत्री म्हणून काम कर. यशस्वी होशील. १९७५ मध्ये दिग्दर्शक रघुनाथ जालानी यांच्या 'उलझन' या चित्रपटातून सुलक्षणा यांनी व्यावसायिक अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले व पहिल्याच चित्रपटात संजीव कुमार यांच्या सोबत त्यांची जोडी हिट ठरली. याच चित्रपटात किशोर कुमार यांच्यासोबतचे युगल गीत 'आज प्यारे प्यारे से लगते है आप' हे त्यांनी आपल्या आवाजात गायले. याच चित्रपटापासून सुलक्षणाचे संजीव कुमारवर एकतर्फी प्रेम जडले. त्याच वर्षी 'संकल्प' चित्रपटात अभिनय आणि गायन अशी अमीट छाप सुलक्षणा पंडित यांनी सोडली. त्यातील-'पाप क्या पुण्य है क्या ये भूला दे कर्म कर फ़ल की चिंता मिटा दे ये परीक्षा न होगी दोबारा ढूँढता है तू किसका सहारा तू ही सागर तू ही किनारा ।।' हे दुःख-वियोगातील गीत त्यांच्या आवाजातील प्रगल्भता दर्शविणारे ठरले. त्यासाठी त्यांना महिला पार्श्वगायिकेचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. पुढे बंगाली भाषेतील परिणिताचा हिंदी रिमेक म्हणजे १९७६ चा जितेंद्रसोबत आलेला 'संकोच.' या चित्रपटाला सुलक्षणाने गायलेल्या 'बांधी रे काहे प्रीत' या गीताला रसिकांनी मोठी पसंती दिली. त्यानंतर सलाखें, शंकर-शंभू, अपनापन, खानदान अशा अनेक चित्रपटांत सुलक्षणा पंडित यांनी अभिनयाची चुणूक दाखवली. याशिवाय, १९८१ मध्ये 'आहिस्ता आहिस्ता' चित्रपटातील गाणे अजरामर ठरले-

**'माना तेरी नज़र में**
**तेरा प्यार हम नहीं,**
**कैसे कहें के तेरे**
**तलबग़ार हम नहीं।।**

सुलक्षणा पंडित यांनी १९८३ मध्ये चित्रपट निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले आणि तो निर्णय त्यांच्या आयुष्यातील आर्थिक टंचाईला कारणीभूत ठरला. जितेंद्र यांनी त्यांना मदतीचा हात देऊ केला तेव्हा बऱ्याच अंशी सुलक्षणा त्यातून बाहेर पडली. सुलक्षणाने कधीही लग्नद केले नाही. असेही म्हणतात की, तिचे संजीव कुमारवर निस्सीम प्रेम होते. तिची अपूर्ण प्रेमकहाणी हेच लग्न न करण्याचे प्रमुख कारण मानतात. संजीव कुमारने सुलक्षणाचा लग्नाचा प्रस्ताव नाकारला. त्यामुळे ती इतकी दुखावली की, तिने कधीही लग्न न करण्याचा निर्णय घेतला आणि त्यावर आयुष्यभर ठाम राहिली. याच स्थितीत असताना सुलक्षणा हळूहळू नैराश्यात गेली. तणावामुळे सुलक्षणाचे प्रकृतीकडे दुर्लक्ष होत गेले. व्याधी जडल्या. कालानुरूप बदलांमुळे चित्रपटात काम मिळणे बंद होत गेले. म्हटले तर चित्रपटसृष्टी तिच्यापासून दूर होत गेली. १९८५ मध्ये संजीव कुमारच्या निधनानंतर ती इतकी खचून गेली होती की, तिने आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला. एका मुलाखतीत सुलक्षणाने स्वतः हे मान्य केले होते की, मी स्वतःला संपवले होते. पण देवाच्या कृपेने मी वाचले आणि अजूनही आयुष्य जगत आहे. परंतु, मी अजूनही त्या आघातातून सावरलेली नाही. पुढे मोठा भाऊ मंधीर व लहान बहीण विजयताचा नवरा आदेश श्रीवास्तव यांच्या मृत्यूने तिच्या नैराश्यात आणखीच भर पडली. किती विचित्र योगायोग म्हणावा की, सुलक्षणा ज्यांच्यावर सर्वात जास्त प्रेम करत होती त्याच व्यक्तीच्या मृत्यूच्या तारखेलाच तिनेही या जगाचा निरोप घ्यावा. ६ नोव्हेंबर हा संजीव कुमारचा पुण्यतिथी दिन आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या सुलक्षणाने पण याच दिवशी जगाचा निरोप घेतला. याला मृत्यूचा 'सुक्षण' योगच म्हणावा लागेल. 'अपने जीवन की उलझन, को कैसे मैं सुलझाऊं बीच भंवर मे नाव है मेरी, कैसे पार लगाऊं' 'उलझन' चित्रपटातील हे गीत सुलक्षणा यांच्या जीवनाचा सारांश सांगणारे आहे. सुलक्षणा पंडित यांना विनम्र श्रद्धांजली.

सागर कोतवालिवाले

# दीपिकाला नकोय आता बिग बजेट सिनेमा



अभिनेत्री दीपिका पादुकोणची 'स्पिरिट' आणि 'कल्कि २८९८ एडी २' या चित्रपटांच्या सीक्वलमधून एक्झिट झाल्यानंतर खूप चर्चेत राहिली होती. दीपिकाने अनेक मागण्या ठेवल्या होत्या, त्यानंतर निर्मात्यांनी तिला चित्रपटातून काढून टाकले, अशा बातम्या होत्या. आता दीपिका म्हणाली की, तिला मोठ्या बजेटचे चित्रपट उत्साहित करत नाहीत. एका मुलाखतीत दीपिका म्हणाली की, तिला आता बिग बजेट चित्रपट उत्साहित करत नाहीत. ती म्हणाली, प्रामाणिकपणे सांगायचे तर, किती जास्त प्रसिद्धी, किती जास्त यश, किती जास्त पैसा? या टप्प्यावर आता हे याबद्दल राहिलेले नाही. हा १०० कोटींच्या चित्रपटाबद्दल नाही, की ५०० किंवा ६०० कोटींच्या चित्रपटाबद्दल नाही. आता मला हे उत्साहित करत नाही. मला जो उत्साह देतो, तो आहे प्रतिभेला प्रोत्साहन देणे. माझी टीम आणि मी आता याच गोष्टीवर लक्ष केंद्रित करत आहोत. कथाकथन चांगले करणे आणि सर्जनशील विचार, लेखक, दिग्दर्शक आणि नवीन निर्मात्यांना पाठिंबा देणे. आता माझ्यासाठी हे सर्व अर्थपूर्ण आहे. याच वर्षी दीपिकाला संदीप रेड्डी वांगा यांच्या 'स्पिरिट' चित्रपटातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला होता. दीपिकाला काढून चित्रपटात तृप्ती डिमरीला कास्ट करण्यात आले. तसेच, 'कल्कि २८९८ एडी २' या चित्रपटातूनही दीपिकाला काढण्यात आले. निर्मात्यांनी स्वतः याची घोषणा केली होती. आता दीपिकाच्या हातात दोन मोठे चित्रपट आहेत. ती शाहरुख खानसोबत 'किंग' चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ आनंद करत आहेत. तसेच, सुहाना खान देखील या चित्रपटात दिसणार आहे. याव्यतिरिक्त, दीपिका एटलीच्या चित्रपटातही दिसणार आहे. या चित्रपटात अल्लू अर्जुन मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटाचे शीर्षक '22w6' असे ठेवण्यात आले आहे. हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होईल. तर शाहरुख खानचा 'किंग' चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होईल.

# हिमॅन अन् ड्रिमगर्लकडून बरंच काही शिकण्यासारखं...

बॉलीवूड इंडस्ट्रीतील अशा अनेक जोड्या आहेत, ज्यांच्या प्रेमाचे किस्से खूपच प्रसिद्ध आहेत आणि त्यातील एक जोडी म्हणजे धर्मेंद्र–हेमामालिनी. पडद्याप्रमाणेच खऱ्या आयुष्यातही या जोडीने एकमेकांना कायम साथ दिली. पहिले लग्न झाले असताना आणि ४ मुलं असतानाही हेमामालिनी यांनी धर्मेंद्र यांच्याशी लग्न केले. हेमामालिनी यांच्या प्रेमात धर्मेंद्र यांनी सर्व मर्यादा पार केल्या होत्या. मात्र त्यांनी पहिल्या पत्नीला घटस्फोट न देता दुसरे लग्न केले. कशी आहे या कपलची लव्ह स्टोरी आणि या जोडीकडून बरंच काही शिकण्यासारखं आहे ते जाणून घ्या...



धर्मेंद्र यांचे पहिले लग्न प्रकाश कौर यांच्याशी झाले होते आणि त्यांना मुलंही होती. हेमामालिनी यांच्याशी लग्न करण्यासाठी त्यांनी आणि आपले लग्न वैध आहे दाखविण्यासाठी इस्लाम धर्म स्वीकारला आणि दिलावर खान असे नावही स्वीकारले तर हेमामालिनी यांनी आयशा बी असे ठेवले आणि १९८० मध्ये दोघांनी लग्न केले. मात्र, या अफवा असल्याचा खुलासा खुद्द धर्मेंद्र यांनीच केला होता.

**हेमामालिनी यांची पहिली भेट –** धर्मेंद्र आणि हेमामालिनी यांची पहिली भेट १९७० मध्ये तुम हसीन मैं जवान या चित्रपटादरम्यान झाली होती. दोघेही मुख्य भूमिकेत होते. या दरम्यान दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. यानंतर दोघेही एकमेकांच्या बाबतीत गंभीर होत गेले आणि चित्रपटाच्या सेटवर धर्मेंद्र यांनी हेमामालिनी यांना सर्वांसमोर तुझं माझ्यावर प्रेम आहे का? विचारलं होतं.

**संसार कसा करावा–** धर्मेंद्र आणि हेमामालिनी यांच्या लग्नाला ४३ वर्ष झाली आणि या दोघांना २ मुली असून त्यांचीही लग्न झाली आहेत. या जोडीकडे पाहिल्यावर हेच वाटायचे की या दोघांसारखा संसार करावा. हेमामालिनी यांनी धर्मेंद्र यांना ते जसे आहेत तसंच स्वीकारलं आणि धर्मेंद्र यांनीही त्यांना साथ दिली.

**पहिलं लग्न आड आलं नाही–** धर्मेंद्र यांनी आपल्या कुटुंबाला सोडणार नाही हे हेमामालिनी यांच्याकडे स्पष्ट केलं होतं आणि त्यांनी दोन्ही संसार व्यवस्थित सांभाळले. हेमामालिनीशी संसार करताना कधीही त्यांचे पहिले लग्न आणि पहिली बायको आड येऊ दिले नाही. नात्यामधील गुंतागुंत धर्मेंद्र यांनी सोडवत दोघींशीही सुखाने संसार केला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नातं टिकवणं हे धर्मेंद्र आणि हेमामालिनी यांच्याकडून शिकण्यासारखे आहे.

**नात्यातील आदर –** धर्मेंद्र आणि हेमामालिनी यांच्या नात्यातील आदर दिसून यायाचा. साधारण ११ वर्षांनी हेमामालिनी या धर्मेंद्र यांच्यापेक्षा वयाने लहान होत्या. मात्र दोघेही एकमेकांना कायम सांभाळून घेत आले. मुलांमध्येही कधीच सावत्रपणाची वागणूक दिसून आली नाही. प्रत्येक नाते कसे जपावे हे या जोडीकडून शिकण्यासारखे होते.




# कसा होता धर्मेंद्र यांचा राजकीय प्रवास?



ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे २४ नोव्हेंबर त्यांच्या जुहूमधील निवासस्थानी निधन झाले. आपल्याला अभिनेता व्हायचे आहे, हे ते ठरवूनच आले होते. मात्र, अभिनेता झाल्यानंतर ते नेतादेखील झाले होते. धर्मेंद्र यांनी २००४ मध्ये भारतीय जनता पक्षाकडून राजस्थानमधील बिकानेर मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली होती. ही त्यांची पहिलीच निवडणूक होती आणि ते पहिल्यात निवडणुकीत खासदार झाले. २००४ ते २००९ या कालावधीत खासदार म्हणून जनतेची सेवाही केली. मात्र निवडणूक प्रचारादरम्यान लोकशाहीचे मूलभूत शिष्टाचार शिकवण्यासाठी हुकूमशहाला आयुष्यभर निवडून दिले पाहिजे, असे वादग्रस्त विधान त्यांनी केली. त्यामुळे त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टिकेची झोड उठली होती. मात्र सिनेमाच्या मोठ्या पडद्यावर रमणारे धर्मेंद्र राजकारणात फारसे रमले नाहीत. संसदेच्या अधिवेशनातही ते कमी हजर राहत. त्यादरम्यान ते त्यांच्या सिनेमाच्या शूटींगमध्ये बिझी असत. तर कधी ते त्यांच्या फार्महाऊसवर राहणे पसंत करत. यामुळे त्यांना अनेकवेळा टिकेचा सामना करावा लागत असे. दरम्यान २००४ मध्ये राजकारणात प्रवेश करण्याआधी काँग्रेसने धर्मेंद्र यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. ही तक्रार हेमा मालिनी यांच्याशी लग्न करण्यासाठी धर्मेंद्र यांनी हिंदू धर्म सोडून मुस्लीम धर्म स्वीकारल्याचे निवडणूक नोंदणी अर्जात नमूद केले नसल्यासंदर्भात होती. त्यावरून वादही निर्माण झाला होता. मात्र या वादग्रस्त परिस्थितीतही धर्मेंद्र यांनी आपल्या खासदारकीचा कार्यकाळ पूर्ण केला. धर्मेंद्र यांच्यानंतर त्यांच्या दुसर्या पत्नी हेमा मालिनी याही राजकारणात सक्रीय झाल्या. सध्या त्या मथुरेच्या खासदार आहेत. तर धर्मेंद्र यांचे पुत्र अभिनेते सन्नी देओल पंजाबमधील गुरुदासपूर जिल्हाचे माजी खासदार असून राजकारणापासून सध्या दूर असून चित्रपटसृष्टीत काम करत आहेत.

# सुवर्ण युगाचा अस्त

बॉलीवूडमधील दिग्गज अभिनेत्यांमध्ये धर्मेंद्र यांचे नाव आवर्जून घेतले जाते. बसंती इन कुत्तो के सामने नत नाचना आणि एक एक को चुन चुन के मारुंगा हे डायलॉग्ज धर्मेंद्र यांनीच अजरामर केले. त्यांची खास शैलीतील संवाद फेक, त्यांनी समरसून केलेल्या भूमिका ६० च्या दशकाप्रमाणेच आजही लाखो चाहत्यांच्या हृदयांवर राज्य करत आहेत. भूमिका हिरोची असो वा व्हिलनची की विनोदी धर्मेंद्र प्रत्येक भूमिकेची छाप प्रेक्षकांच्या मनावर सोडायचे.

धर्मेंद्र यांचा जन्म पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील नसराली गावातला. ते कट्टर जाट समुदायाचे असल्याने मनोरंजन सृष्टीशी त्यांचा किंवा त्यांच्या कुटुंबियांचा दूरदूरपर्यंत काहीही संबंध नव्हता. पण धर्मेंद्र यांना सिनेमा पाहण्याची आवड होती. याचदरम्यान त्यांनी सुरैय्या यांचा दिल्लगी हा सिनेमा बघितला. हा सिनेमा त्यांना एवढा भावला की, आपणही सिनेमात काम करायचा असा निर्णय त्यांनी घेतला. मात्र चित्रपटसृष्टीत कसा प्रवेश करायचा हे देखील त्यांना माहीत नव्हते. मात्र नई प्रतिभा की खोज या स्पर्धेत त्यांनी भाग घेतला आणि त्यांचे नशीबच बदलले. या स्पर्धेमुळे त्यांची हिंदी चित्रपटसृष्टीत एन्ट्री झाली. उंचपुरे देखणे रुप, आकर्षक देहयष्टी आणि भारदस्त आवाज आणि त्याला साजेसा पंजाबी ॲटीट्यूड यामुळे १९६० साली दिल भी तेरा हम भी भी तेरे या सिनेमातून त्यांनी मोठ्या पडद्यावर प्रवेश केला. त्यानंतर शोला और शबनम, अनपढ, बंदिनी यासारखे सिनेमे त्यांनी केले. पण धर्मेंद्र यांना खरी ओळख दिली ती १९६६ मध्ये आलेल्या फूल और पत्थर या सिनेमाने. या सिनेमाला, धर्मेंद्रला प्रेक्षकांनी अक्षरश डोक्यावर घेतले आणि एका रात्रीत धर्मेंद्र स्टार झाले. त्यानंतर त्यांच्या व्यक्तीमत्वाला साजेसे ही मेन ऑफ इंडियन सिनेमा असे नाव त्यांना देण्यात आले. सिनेमातील त्यांचे व्यक्तीमत्व, संवादफेक, ॲक्शन, पडद्यावर त्यांचा सहज वावर बघून प्रेक्षकांनी धर्मेंद्र यांना अक्षरश डोक्यावर घेतले.

धर्मेंद्र नावाची जणू लाटच देशात आली. पुरुषांप्रमाणेच महिलाही त्यांच्या दिवाण्या झाल्या. तरुणीचं नाही तर विवाहित महिलाही धर्मेंद्र यांच्याबरोबर लग्न करण्याचे स्वप्न बघू लागल्या. जणू धर्मेंद्र नावाचा झंझावात हिंदी सिनेसृष्टीत पहील्यांदाच अवतरला होता. त्यानंतर धर्मेंद्र यांनी एकामागोमाग एक हिट सिनेमे दिले. ज्यात शोले, चुपके चुपके, अनुपमा, सत्यकाम, राजा जानी, यादो की बारात यासारख्या सिनेमांचा समावेश आहे. या सिनेमांमुळे धर्मेंद्र यासारखा अष्टपैलू अभिनेता बॉलीवूडला गवसला होता. आपल्या कार्यकीर्दीत धर्मेंद्र यांनी फक्त ॲक्शनच सिनेमेच केले नाहीत तर कॉमेडी आणि रोमेंटीक हिरो म्हणूनही आपली वेगळी ओळख निर्माण केली. हिंदी चित्रपटसृष्टीत सहा दशकांहूनही अधिक काळ राज्य केलेल्या धर्मेंद्र हून अधिक सिनेमे केले आहेत.






## मैत्रीसाठी धर्मेंद्र यांनी मराठी चित्रपटात शूट केलं होतं गाणं

बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचं वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती बिघडलेली होती. त्यांच्यावर मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र नंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला होता. अखेर सोमवारी धर्मेंद्र यांनी राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला आहे.

धर्मेंद्र यांनी ३०० हून अधिक सिनेमांच्या कारकिर्दीत अनेक भूमिका बजावल्या आहेत. तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल की त्यांनी केवळ मैत्रीखातर मराठी गाण्यातही काम केलं आहे. नक्की हे गाणं कोणतं आहे जाणून घेऊया...

बॉलीवूडच्या ही-मॅनने मैत्रीखातर एका मराठी चित्रपटात काम केले होते. मिळालेल्या माहितीनुसार मुंबईतील चांदिवली स्टुडिओचे मालक हेंमत कदम हे धर्मेंद्र यांचे जिवलग मित्र होते. धर्मेंद्र चित्रपटसृष्टीतील एवढे मोठे कलाकार असूनही त्यांनी मैत्रीला कधीच कमी लेखलं नव्हतं. केवळ मैत्रीखातर त्यांनी हेंमत कदम यांच्या 'हिचं काय चुकलं' या मराठी चित्रपटातील एका गाण्यात काम करण्यासाठी होकार दिला होता. त्यावेळी चित्रपटांचे एवढे बिझी शेड्यूल असतानाही धर्मेंद्र यांनी या शुटींगसाठी दोन दिवसांचा वेळ काढला होता आणि चांदिवली स्टुडिओत हे शुटिंग पूर्ण केलं होतं.

हेमंत कदम यांच्या हिचं काय चुकलं या मराठी चित्रपटातील घेऊन टांगा सर्जा निघाला, दूर धन्याचा गाव, अरे तू धाव.. हे गाणं ते होतं. त्याकाळी हे गाणं भरपूर गाजलं. विशेष म्हणजे त्यांनी दिवंगत अभिनेते विक्रम गोखले यांच्यासोबत कमालीचा अभिनय केला होता. सिने समीक्षक दिलीप ठाकूर यांनी धर्मेंद्र यांची सांगितलेली ही आठवण खूपच प्रेरणादायी आहे.





# गुवाहाटी फाईल्स चित्रपट येणार?

साऊथ नुकत्याच एका मुलाखतीत अभिनेते मंगेश देसाई यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे ते चर्चेत आले आहेत. एक मुलाखतीत त्यांनी धर्मवीर ३ संदर्भात अपडेट दिली आहे. मंगेश देसाई यांना धर्मवीर ३ प्रेक्षकांच्या भेटीला येणार का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी आधी धर्मवीर, नंतर धर्मवीर २ आणि मी जर सिनेमा केला तर धर्मवीर ३ नाही तर 'गुवाहाटी फाईल्स' या नावाने सिनेमा करेल, असे वक्तव्य त्यांनी केले आहे. त्यामुळे आता या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांना उत्सुकता लागलेली आहे. मंगेश देसाई यांचा धर्मवीर हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला. हा चित्रपट शिव-सेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या जीवनावर आधारित होता.

२०२२ मध्ये धर्मवीर चित्रपट प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी काही आमदार आणि खासदारांसह उद्धव ठाकरे यांची साथ सोडली. त्यानंतर धर्मवीर २ हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात एकनाथ शिंदेंनी भाजपसोबत युती करत सत्ता स्थापन का केली? हे दाखवण्यात आले होते. आता प्रेक्षकांना धर्मवीर ३ चित्रपटात काय दाखविण्यात येणार याबद्दल चर्चा सुरू असतानाच मंगेश देसाई यांनी केलेल्या वक्तव्याची जोरदार चर्चा होत आहे. दिग्दर्शक महेश मांजरेकर दिग्दर्शित पुन्हा शिवाजीराजे भोसले या चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान दिलेल्या मुलाखतीत मंगेश देसाई यांनी धर्मवीर ३ प्रेक्षकांच्या भेटीला येणार का? या प्रश्नावर उत्तर देताना, आधी धर्मवीर, नंतर धर्मवीर २ आणि मी जर सिनेमा केला तर धर्मवीर ३ नाही तर 'गुवाहाटी फाईल्स' या नावाने सिनेमा करेल.

तसंच तो सिनेमा २०२७-२०२८ या दरम्यान करेन. परंतु अजून या सिनेमाबाबत नक्की असं काहीच नाही. दूर करण्यासाठी साजऱ्या होणाऱ्या गोंधळाच्या माध्यमातून सिनेमाची कथा तयार केली आहे. सिनेमाचे लेखन संतोष डावखर यांनी केले आहे. या सिनेमात अभिनेते किशोर कदम हे महत्वाची भूमिका साकारत आहेत. नुकताच गोंधळ सिनेमा चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे.






# माधुरीसोबत झळकणार 'हा' अभिनेता

माधुरी दीक्षित गेल्या काही दिवसांपासून तिच्या 'मीट अँड ग्रीट माधुरी' या शोमुळे चर्चेत आहे. तिचे या शोमधील अनेक डान्स व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. माधुरीला स्क्रीनवर पाहण्यासाठी प्रेक्षक नेहमीच आतुर असतात. गेल्या काही महिन्यांपासून माधुरी नव्या कोणत्या प्रोजेक्टमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार याबद्दल सर्वत्र चर्चा रंगली होती. अखेर 'धकधक गर्ल'ने तिच्या आगामी प्रोजेक्टची घोषणा केलेली आहे. इन्स्टाग्रामवर पहिला टीझर शेअर करत माधुरी दीक्षितने तिच्या आगामी सीरिजची घोषणा केली आहे.

अभिनेत्री लवकरच 'मिसेस देशपांडे' या सायकोलॉजिकल थ्रिलर प्रोजेक्टमध्ये झळकणार आहे. अद्याप या सीरिजची रिलीज डेट जाहीर करण्यात आलेली नाही. प्रेक्षकांना ही थ्रिलर सीरिज जिओहॉटस्टारवर पाहता येणार आहे. माधुरी दीक्षितसह या सीरिजमध्ये लोकप्रिय मराठी अभिनेता सुद्धा झळकणार आहे. "My Newt' असं कॅप्शन देत या अभिनेत्याने तो 'मिसेस देशपांडे'मध्ये झळकणार असल्याचं जाहीर केलं आहे. त्याचं नाव आहे सिद्धार्थ चांदेकर. मराठी मालिका, चित्रपट आणि वेबसीरिज अशा तिन्ही माध्यमांतून घराघरांत लोकप्रिय झालेला अभिनेता सिद्धार्थ चांदेकर आता धकधक गर्ल माधुरी दीक्षितसह स्क्रीन शेअर करणार आहे. माधुरीने 'मिसेस देशपांडे' सीरिजची पहिली झलक शेअर केल्यावर चाहत्यांनी या टीझरवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. या टीझरमध्ये सुरुवातीला माधुरी पारंपरिक लूक करून तयार झालेली दिसते. ती आरशासमोर बसलेली असतेपण अचानक ती दागिने काढते, मेकअप पुसते अन् एका वेगळ्याच लूकमध्ये प्रेक्षकांसमोर येते. या सीरिजचं दिग्दर्शन नागेश कुकुनूर यांनी केलं आहे. तिच्या या सीरिजसाठी सगळेच उत्सुक आहेत. लवकरच 'मिसेस देशपांडे'ची रिलीज डेट जाहीर केली जाईल.

# 'द पॅराडाइज'मध्ये सोनाली कुलकर्णी



'सैराट' 'द पॅराडाइज' चित्रपटाच्या निर्मात्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुख्य नायिका सोनाली कुलकर्णीचा फर्स्ट लुक जारी केला आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेत नानी आहे, तर याचे दिग्दर्शन श्रीकांत ओडेला करत आहे. चित्रपटातील सोनाली कुलकर्णीची भूमिका अत्यंत वेगळी असल्याचे निर्मात्यांकडून सांगण्यात आले आहे. हा चित्रपट पुढील वर्षी २६ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शक श्रीकांत ओडेला आणि नानी यांनी यापूर्वी 'दसरा' चित्रपटासाठी एकत्र काम केले होते. तर द पॅराडाइज हा चित्रपट नानीच्या कारकीर्दीतील सर्वात मोठा आणि खास प्रोजेक्ट असल्याचे मानले जात आहे. एसएलव्ही सिनेमाच्या सहकार्यातून निर्मित 'द पॅराडाइज' चित्रपट ८ भाषांमध्ये म्हणजेच हिंदी, तेलगू, इंग्रजी, स्पॅनिश, बंगाली, कन्नड आणि मल्याळी भाषेत प्रदर्शित होणार आहे. श्रीकांत ओडेलाने स्वत:चे दिग्दर्शकीय पदार्पण 'दसरा' चित्रपटाद्वारे केले होते. या चित्रपटाचे समीक्षकांकडुन कौतुक करण्यात आले होते तसेच तो बॉक्स ऑफिसवर हिट ठरला होता. या चित्रपटाने १०० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली होती. हा चित्रपट नानीच्या कारकीर्दीतील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला होता.

# साऊथ सुपरस्टारची 'हैवान'मध्ये एन्ट्री



दाक्षिणात्य अभिनेता अक्षय कुमार आणि सैफ अली खान मुख्यभूमिकेत असलेल्या 'हैवान' चित्रपटाची अपडेट समोर आली आहे. यात आता मल्याळम चित्रपटसृष्टीचा सुपरस्टार काम करणार आहे. 'हैवान' चित्रपटात साऊथ सुपरस्टार मोहनलाल यांची एन्ट्री होणार आहे. मोहनलाल यांनी 'हैवान'च्या शूटिंगला सुरुवात केली असून, याबद्दलची माहिती दिग्दर्शक प्रियदर्शन यांनी सोशल मीडियावर दिली आहे. प्रियदर्शन यांनी आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर सैफ अली खान आणि मोहनलाल यांच्यासोबतचा एक फोटो शेअर केला आहे, ज्यात त्यांच्यासोबत एक लहान मुलगीही दिसत आहे. त्यामुळे आता या चित्रपटाबाबतची चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. या फोटोला कॅप्शन देत प्रियदर्शन यांनी लिहिले की, आयुष्य कसं बदलतं ते पहा. मी इथे 'हैवान'च्या शूटिंग सेटवर आहे, माझ्या सर्वात मोठ्या क्रिकेट नायकांच्या मुलासोबत आणि माझ्या आवडत्या चित्रपट अभिनेत्यासोबत (मोहनलाल) काम करत आहे. खरंच, देव खूप दयाळू आहे. प्रियदर्शन यांनी शेअर केलेल्या फोटोमध्ये मोहनलाल आणि सैफ अली खान दोघेही काळ्या रंगाचे चष्मे आणि हातात काठी घेऊन दिसत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मोहनलाल या चित्रपटात कॅमिओ भूमिकेत दिसणार आहे. ते एका चित्रपटात अंध व्यक्तीची भूमिका साकारण्याची शक्यता आहे. मात्र, त्याबद्दल कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

# राजामौलींच्या 'वाराणसी'मध्ये दिसणार रामायणाचा काळ




पॅन बाहुबली आणि RRR सारखे भव्य चित्रपट देणारे दिग्दर्शक एस.एस. राजामौली आणि सुपरस्टार महेश बाबू यांचा आगामी चित्रपट 'SSMB29' चे अधिकृत नाव आता 'वाराणसी' असे निश्चित झाले आहे. चित्रपटाचे पहिले पोस्टर आणि 'फर्स्ट लूक' समोर आल्यानंतर चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. विशेष म्हणजे या सिनेमात रामायणाचा काळही दिसणार आहे. याशिवाय बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेता सिनेमात हनुमानाची भूमिका साकारताना दिसणार आहे. 'वाराणसी'च्या फर्स्ट लूकमध्ये श्रीराम आणि हनुमानाची झलक दाखवण्यात आली आहे. त्यामुळे चित्रपटात महेश बाबू कोणती भूमिका साकारणार याबद्दल चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता होती. आधी असा अंदाज होता की महेश बाबू हनुमानाची भूमिका साकारणार. परंतु आता समोर आलेल्या माहितीनुसार, राजामौली यांनी चित्रपटात हनुमानाची भूमिका साकारण्यासाठी एका बॉलिवूड अभिनेत्याला कास्ट केलं आहे. तो अभिनेता दुसरा कोणी नसून तो आहे बॉलिवूड- दाक्षिणात्य अभिनेता आर. माधवन. माधवनचं नाव 'वाराणसी' या चित्रपटाशी बऱ्याच दिवसांपासून जोडले जात होते, पण 'वाराणसी'च्या लाँचिंग इव्हेंटमध्ये त्याच्या नावाची घोषणा करण्यात आली नव्हती, ज्यामुळे चाहत्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. परंतु, आताच्या रिपोर्टनुसार आर. माधवन 'हनुमानाची' भूमिका साकारणार असल्याचे निश्चित झाले आहे. माधवनने अद्याप चित्रपटाचे शूटिंग सुरू केलेले नाही, पण लवकरच तो 'वाराणसी'च्या सेटवर काम सुरू करेल.

माधवनचं शूटिंग पुढील वर्षी सुरू होण्याची शक्यता आहे. माधवनला प्रथमच पौराणिक भूमिकेत पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. 'वाराणसी'च्या मेकर्सनी २०२६ पर्यंत चित्रपटाचे संपूर्ण काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे, जेणेकरून त्यानंतर एडिटिंगसाठी पुरेसा वेळ मिळेल. हा भव्य चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. या चित्रपटात महेश बाबू, प्रियंका चोप्रा आणि पृथ्वीराज हे कलाकार प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत. मीडिया रिपोर्टनुसार 'वाराणसी'चं बजेट १३०० कोटींच्या आसपास आहे. या सिनेमात पौराणिक काळापासून सध्याचा आधुनिक काळ दिसणार आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हा सिनेमा प्रेक्षकांना अविस्मरणीय अनुभव देईल यात शंका नाही. त्यामुळेच 'वाराणसी'चं बजेट १३०० कोटी असल्याचं बोललं जातंय.

# देवदूत: आशयघन संहिता आणि प्रभावी अभिवाचन

**प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख हे साहित्य आणि समीक्षा विश्वातील एक लक्षवेधक नाव. नुकतीच त्यांची जयंती झाली. त्यानिमित्त सोलापूरच्या नाट्य परिषदेने त्यांच्या 'रंगवर्धन' उपक्रमात प्रा. सरदेशमुख यांच्या 'देवदूत' या वैचारिक साहित्यबंधाच्या अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजिला होता. साहित्यिक पत्रकार व रंगकर्मी रजनीश जोशी यांनी 'देवदूत'ची रंगावृत्ती तयार केली होती. तिचे प्रभावी अभिवाचनही त्यांनीच केले. पंचम आणि प्रशांत देशपांडे यांनी त्याला पार्श्वसंगीताचा साज चढवला होता. खलील जिब्रान यांच्या 'द प्रॉफेट' या साहित्यकृतीचा 'देवदूत' हा भावानुवाद आहे.**

सांस्कृतिक सोलापूर
शरद कुमार एकबोटे
भ्र. ९१७५५८०६१२

अभिवाचन हे एक आव्हान असतं. श्रोत्यांना त्यात गुंतवून ठेवणं हे सहजसाध्य असत नाही. प्रभावी, स्वच्छ उच्चार, सरस, सहज संयमित अभिनय, अर्थपूर्ण कटाक्ष, चेहऱ्यावरील भावदर्शन, आवाजातील कोमल व कठोर जागा, आत्मविश्वास आणि संहितेला योग्य न्याय देण्याची जाण अशी गुणवैशिष्ट्ये असल्याखेरीज श्रोत्यांची दाद मिळणे कठीण. मात्र रजनीश जोशींनी या सर्वगुणांच्या समुच्चयामुळे रसिकांची मनमुराद दाद मिळवली. प्रेम, विवाह, संतती, दान, कर्म, आनंद, वेदना, घरदार, अपराध, शिक्षा, मुक्ती, बुद्धी आणि भावना, मैत्री, प्रार्थना, सुख, लावण्य, धर्म, मृत्यू अशा अनेकविध विषयांवर 'देवदूत' भाष्य करतो. ते ऐकल्यावर कळते की पारंपरिक कल्पनांची चौकट भेदून त्यानं वेगळ्या अर्थाचे अनेक पैलू उलगडले आहेत. हे नवे अर्थ आणि त्यांची वळणे अज्ञात तत्वांच्या अंगाने जातात.



रजनीश जोशी अशा वळणांशी सहज समरस होतात. या साऱ्या भावभावनांचा आविष्कार उच्चारातून करताना त्यांना श्रोत्यांच्या हृदयाशी संवाद साधणे सहज शक्य झाले, यात संशय नाही. खलील जिब्रान, प्रा. सरदेशमुख आणि रजनीश जोशी यांच्या त्रिवेणी संगम प्रवाहात रसिकांची समाधी लागते. हे एक आदर्श अभिवाचन होते. 'सूर्याच्या आकाशमार्गावरून गरूड भरारी घेतो तो एकटाच, त्याला थोडंच घरटं वाहून नेता येतं?', 'प्रेम तुम्हाला राजवैभव देईल, तसंच सुळावरही नेईल', 'ओक आणि सायप्रस हे वृक्ष एकमेकांच्या छायेत वाढत नाहीत,' 'तुमच्या धनदौलतीतलं तुम्ही दान देता तेव्हा तुम्ही तुमचं काहीच दिलेलं असत नाही'... अशा काही सौंदर्यगर्भ गूढ स्थळांना अभिवाचकानं जी उंची दिली, तिला स्पर्श करताना प्रा. सरदेशमुख आणि जिब्रान यांच्या साहित्यातील आवाका, त्यांचं सामर्थ्य प्रत्ययाला येतो. श्रोत्यांवरील हा प्रभाव म्हणजे रजनीश जोशी यांच्या अभिवाचनाची फलश्रुती म्हणता येईल. ही आशयघन संहिता आणि तिचं प्रभावी वाचन रसिक श्रोत्यांच्या मनावर दीर्घकाळ रेंगाळत राहिल. 'रंगवर्धन'चा हा उपक्रम देखणा आणि लोभसवाणा झाला हेही तितकेच खरे !



# इमरान खानचे कमबॅक



अभिनेता इमरान खानने 'जाने तू या जाने ना' सिनेमातून बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये पदार्पण केले. त्यानंतर तो काही सिनेमांमध्ये दिसला आणि गायब झाला. आता तो पुन्हा एकदा कमबॅकसाठी सज्ज झाला आहे. दिग्दर्शक दानिश असलमच्या आगामी सिनेमात इमरान खान मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या सिनेमात इमरान खानसोबत अभिनेत्री भूमी पेडणेकर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. एका मुलाखतीत इमरान खान म्हणाला, माझा हा सिनेमा ब्रेक के बाद सारखाच आहे. हा सिनेमा दानिश आणि माझ्या आयुष्यातील अनुभवांवर आहे. दानिशचं लग्न झालं आहे तर माझा घटस्फोट झाला आहे. हा एक वैयक्तिक प्रोजेक्ट आहे. सर्वांनी मिळूनच भूमीची निवड केली. सेटवर तिच्या असण्याने खूप मजा आली.

माझ्यासाठी या सिनेमाचा सेट करिअरमधला सर्वात मजेशीर सेट होता. सिनेमाचं शूट पूर्ण झालं असून आता पोस्ट प्रोडक्शनचं काम सुरु आहे. लवकरच सिनेमाच्या रिलीज डेटची घोषणा होणार आहे. इमरान खान २०१५ साली शेवटचा 'कट्टी बट्टी' सिनेमात दिसला होता. यानंतर त्याने अभिनयातून ब्रेक घेतला. मधल्या काळात तो घटस्फोटामुळे चर्चेत होता. आता पुन्हा एकदा इमरानने जय्यत तयारी केली आहे.

# रवीना दिसणार आव्हानात्मक भूमिकेत



प्रसिद्ध अभिनेत्री रवीना टंडनने नेहमीच वेगळ्या धाटणीच्या भूमिका केलेल्या आहेत. ९० दशकात रवीनाने बॉलिवूड इंडस्ट्रीत पदार्पण केल्यानंतर अनेक सिनेमात मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारली. तिने अनेक अभिनेत्रींच्या स्पर्धेत स्वतःला टिकून ठेवले. आजही रवीना अनेक चित्रपटांमध्ये महत्वाच्या भूमिका साकारताना दिसते. आता तिच्या आगामी चित्रपटाबाबत एक अपडेट समोर आली असून, एका आव्हानात्मक भूमिकेत रवीना टंडन दिसणार आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनपटावर आधरित चित्रपटात रवीना महत्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे. ती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आई हिराबेनची भूमिका साकारताना दिसणार आहे. या चित्रपटात मोदी आणि त्यांच्या आई हिराबेन यांच्या नाते चित्ररुपाने दाखविण्यात येणार आहे. पंतप्रधान मोदींची भूमिका दक्षिण भारतीय अभिनेता साकारताना दिसणार आहे. या चित्रपटाचे नाव माँ वंदे असणार आहे. रवीना टंडन ही भूमिका साकारताना भावनिक झाली आहे आणि चित्रपटाची कथा ऐकून ती भावूकही झाली होती. चित्रपटाची खोली, ताकद आणि गुंतागुंत पाहता, ती पंतप्रधान मोदींच्या आईची भूमिका साकारण्यास खूप उत्सुक आहे. या चित्रपटात पंतप्रधान मोदींच्या आईने आपल्या मुलाचे जीवन सुधारण्यासाठी घेतलेल्या त्याग आणि संघर्षांचे चित्रण दाखविण्यात येणार आहे. रवीनाच्या कामाची दखल घेत २०२३ मध्ये तिला भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. मार्को चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारा मल्याळम अभिनेता उन्नी मुकुंदन या चित्रपटात पंतप्रधान मोदींची मुख्य भूमिका साकारताना दिसणार आहे. गेल्या काही वर्षांत त्याने आपल्या उत्कृष्ट अभिनयाने चाहत्यांची मने आणि निर्मात्यांचा विश्वास जिंकला आहे. आता तो एक मोठी जबाबदारी घेत आहे. अहवालांनुसार, हा चित्रपट व्हीएफएक्स आणि प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून बनवला जाईल आणि तो मोठ्या कॅनव्हासवर चित्रित केला जाणार आहे. या चित्रपटात पंतप्रधान मोदींशी संबंधित वास्तविक जीवनातील घटनांचा समावेश असणार आहे. या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत.



# पंकज त्रिपाठी बनणार निर्माता

राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभिनेते पंकज त्रिपाठी आता अभिनेत्याकडून निर्माता बनले आहेत. ते वेब सिरीजद्वारे निर्माता म्हणून पदार्पण करत आहेत. त्यांची पहिली मालिका परफेक्ट फॅमिली असे आहे. ही आठ भागांची नाटक मालिका आहे. परफेक्ट फॅमिली कधी आणि कुठे प्रदर्शित होईल ते जाणून घ्या. पंकज त्रिपाठीची पहिली मालिका थेट धींढींलश वर प्रदर्शित होईल. ही मालिका या प्लॅटफॉर्मवर पेड मॉडेल अंतर्गत प्रदर्शित होत आहे. वृत्तसंस्था झढख नुस-ार, JR पिक्चर्सचे अजय राय आणि मोहित छाब्रा निर्मित आणि पलक भांब्री निर्मित, ही मालिका JR सिरीजच्या धींढींलश चॅनेलवर २७ नोव्हेंबर रोजी प्रीमियर होईल, असे एका प्रेस रिलीजमध्ये म्हटले आहे. निर्मात्यांच्या मते, परफेक्ट फॅमिली ही मालिका भारताच्या विकसित होत असलेल्या डिजिटल इकोसिस्टममध्ये एक महत्वाचा प्रयोग म्हणून सादर करण्यात आली आहे. या मालिकेचे पहिले दोन भाग मोफत उपलब्ध असतील, तर उर्वरित भाग प्रेक्षक ५९ देऊन पाहू शकतात. या मालिकेचे दिग्दर्शन सचिन पाठक यांनी केले आहे आणि त्यात गुलशन देवैया, नेहा धुपिया, मनोज पाहवा, सीमा पाहवा, गिरिजा ओक आणि इतर कलाकार आहेत. 'परफेक्ट फॅमिली' ही एक कॉमेडी-ड्रामा मालिका आहे जी एका कुटुंबाभोवती फिरते. या मालिकेबद्दल पंकज त्रिपाठी म्हणाले की, पारंपारिक रिलीज फॉरमॅटला आव्हान देणार्‍या प्रकल्पात पहिल्यांदाच निर्माता बनणे महत्वाचे वाटले. ते पुढे म्हणाले, 'परफेक्ट फॅमिली' माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. जगभरातील कुटुंबे या शोमध्ये स्वतःचा एक भाग पाहतील.' अभिनेता पुढे म्हणाला, 'यूट्यूबचे पेड मॉडेल भारतीय निर्मात्यांसाठी एक पूर्णपणे नवीन मार्ग उघडते.' ही मालिका करकरिया कुटुंब आणि त्यांचा मुलगा दानी यांची कहाणी सांगते.